RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक ७१] बुधवार, डिसेंबर ३१, २०२५/पौष १०, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ९८

प्राधिकृत प्रकाशन

उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र. ३, ठाणे

अधिसूचना

क्रमांक उजि/भूसं/मेट्रो-३/ठाणे (टिकुजीनीवाडी ते बोरीवली) भुयारी रस्ता/माजिवाडा व चितळसर-मानपाडा/२०२५.– ज्याअर्थी, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर ३, ठाणे, यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम १९ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, **महाराष्ट्र शासन राजपत्रातील** अधिसूचना क्रमांक उजि/भूसं/मेट्रो-३/ठाणे (टिकूजीनी वाडी) ते बोरीवली/२०२५, दिनांक २४ जून, २०२५, अन्वये अधिसूचना काढली असून, त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या **अनुसूची – एक** मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची **अनुसूची दोन** मध्ये तपशीलवार वर्णन केलेल्या विस्तारीत “टिकुजीनीवाडी ते बोरीवली (२+२ मार्गिकेचे २ बोगदे) भुयारी रस्ता” या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात आली आहे.

परंतु ‘मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई’ यांनी मौजे माजिवडे व मौजे चितळसर-मानपाडा मधील काही सर्व्हे नंबर वगळणेबाबत कळविले असल्यामुळे “भूसंपादन व पुनर्वसन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनिमय २०१३,” च्या कलम ९३ (१) अन्वये ‘ समुचित सरकारला, ज्या भूमिचा कब्जा घेण्यात आलेला नाही अशा कोणत्याही भूमिच्या संपादनातून माघार घेण्याचे स्वातंत्र्य असेल असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने संपादन संस्थेने वर नमूद केलेल्या सर्व्हे नंबर संपादित करण्याची आवश्यकता नाही असे कळविलेले सर्व्हे नंबर “ठाणे (टिकुजीनीवाडी), ते बोरीवली (२ + २ अशा ४ पदरी भुयारी) रस्ता” या प्रकल्पामधून वगळण्यात येत आहे.

अनुसूची – एक

वगळण्यात येत असलेल्या जमिनीचा तपशील

मौजे माजिवाडे		
अ. क्र.	सर्व्हे नंबर	वगळणेचे क्षेत्र
१	३१९/२अ	०.००५३
२	३२१/१	०.०१६२
३	३२२	०.०५१७
एकूण		**०.०७३२**

"भूसंपादन व पुनर्वसन, पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३," च्या कलम १९ (१) च्या अधिसूचनेमधून संपादित करावयाचे क्षेत्र खालीलप्रमाणे.

अनुसूची – एक

संपादित जमिनीचा तपशील

तालुका ठाणे, जिल्हा ठाणे

मौजे माजिवाडे		
अ. क्र.	सर्व्हे नंबर	मोजणी नुसार संपादित करावयाचे क्षेत्र
१	३१९/२अ	०.०७००
२	३२१/१	०.२५२०
३	३२१/२	०.५१६१
एकूण क्षेत्र		**०.८३८१**

ठिकाण ठाणे,
दिनांक २४ डिसेंबर २०२५.

वरुणकुमार सहारे,
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र. ३, ठाणे.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.